**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक ३०९ । गुरुवार १० सप्टेंबर २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainikaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# अहिल्यानगर महानगरपालिकेचा मूळ हद्दीचा तिसरा सुधारीत प्रारुप विकास आराखडा व वाढीव हद्दीचा पहिला सुधारीत प्रारूप विकास आराखडा एकत्रित प्रसिद्ध

## हरकती व सूचना दाखल करण्यासाठी ९ ऑक्टोबर पर्यंत मुदत । आयुक्त यशवंत डांगे यांची माहिती

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेचा मूळ हद्दीचा तिसरा सुधारीत प्रारूप विकास आराखडा व वाढीव हद्दीचा पहिला सुधारीत प्रारूप विकास आराखडा एकत्रितपणे १० सप्टेंबर रोजी महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयात व संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. आयुक्त यशवंत डांगे यांनी ही माहिती दिली. या आराखड्यावर नागरिकांना ९ ऑक्टोबरपर्यंत हरकती व सूचना दाखल करता येणार आहेत. यासाठी अहिल्यानगर महानगरपालिका मुख्यालयात आयुक्त कार्यालय तसेच टीव्ही सेंटर येथील उपसंचालक नगररचना डीपी युनिट कार्यालय येथे कार्यालयीन वेळेत या हरकती व सूचना स्वीकारण्याची व्यवस्था करण्यात आली असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

नव्या विकास आराखड्यात शहराच्या भावी वाढीसाठी आवश्यक असणाऱ्या भौतिक व सामाजिक सुविधांसाठी एकूण ४७९ आरक्षणे प्रस्तावित करण्यात आली असून, त्यांचे एकत्रित क्षेत्रफळ ४१५.१५ हेक्टर इतके आहे. यामध्ये क्रीडांगणासाठी सर्वाधिक ९० आरक्षणे (१०३.४३ हेक्टर) निश्चित करण्यात आली असून, त्याखालोखाल उद्यान व बगीच्यासाठी ८४ आरक्षणे (६८.४४ हेक्टर) प्रस्तावित आहेत. याशिवाय भाजी मंडई, खरेदी केंद्र व बाजारासाठी ६० आरक्षणे (११.०० हेक्टर), शैक्षणिक सुविधांसाठी ४० आरक्षणे (२६.२२ हेक्टर), तर रुग्णालये व आरोग्यसेवेसाठी २८ आरक्षणे (१०.६४ हेक्टर) देण्यात आली आहेत. सार्वजनिक वाहनतळासाठी ३२ आरक्षणे, महानगरपालिका प्रयोजनासाठी ३८ आरक्षणे आणि मैला शुद्धीकरण (४ आरक्षणे) व घनकचरा व्यवस्थापनासाठी (१ आरक्षणे) स्वतंत्र जागा आरक्षित करण्यात आल्या आहेत. शहरातील वाहतूक व्यवस्थेच्या नियोजनाच्या दृष्टिकोनातून पार्किंगसाठी ३२ जागांवर आरक्षणे प्रस्तावित करण्यात आली आहेत.

प्रस्तावित आराखड्यानुसार शहराचे एकूण नियोजन क्षेत्र ६८०९.०७ हेक्टर असून, त्यात विकासयोग्य क्षेत्र ६०८२.१५ हेक्टर (८९.३२%) आणि अविकासनीय क्षेत्र ७२६.९२ हेक्टर (१०.६८%) असे वर्गीकरण करण्यात आले आहे. विकासयोग्य क्षेत्रात निवासी वापरासाठी सर्वाधिक ३९४६.०६ हेक्टर (५७.९५%) जमीन प्रस्तावित असून, याद्वारे वाढत्या लोकसंख्येला सामावून घेण्यास प्राधान्य दिले आहे. याव्यतिरिक्त वाहतूक व दळणवळणासाठी १२८१.२९ हेक्टर, सार्वजनिक व निमसार्वजनिक वापरासाठी ३२६.५६ हेक्टर, मनोरंजनात्मक वापरासाठी २८९.५० हेक्टर आणि औद्योगिक तसेच व्यापारी वापरासाठी अनुक्रमे ८०.५७ व ५३.१९ हेक्टर क्षेत्र निश्चित करण्यात आले आहे. अविकासनीय क्षेत्रात प्रामुख्याने कृषी जमीन (४७८.४८ हेक्टर), जलस्रोत (१८४.२६ हेक्टर) आणि वनीकरण (६४.१८ हेक्टर) यांचा समावेश आहे.

हा सुधारीत विकास आराखडा शाश्वत व वाढीभिमुख शहरी विकासाच्या दृष्टिकोनातून तयार करण्यात आला असून, त्यात पर्यावरण संवेदनशील क्षेत्रांचे जतन करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. आर्थिक उपक्रमांसाठी व्यापारी आणि औद्योगिक क्षेत्रांची स्वतंत्र तरतूद केल्याने भविष्यात अहिल्यानगरमध्ये रोजगार निर्मितीला आणि आर्थिक विकासाला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा आहे. तसेच, सार्वजनिक उपयोगिता, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि मनोरंजनाच्या जागांचे योग्य नियोजन करून शहरातील राहणीमानात सुधारणा करणे आणि शहर रचनेची दीर्घकालीन सक्षमता बळकट करण्याचे उद्दिष्ट या आराखड्यातून साध्य करण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

# नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी – खा. निलेश लंके





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्ह्यात पावसाने दिलेल्या प्रदीर्घ खंडामुळे खरीप हंगाम गंभीर संकटात सापडला असून अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. सोयाबीन, तूर, उडीद, मका, कपाशी तसेच चारा पिकांना मोठा फटका बसला असून शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरू करावेत, आवश्यक त्या ठिकाणी चारा छावण्या सुरू कराव्यात आणि जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीचा वस्तुनिष्ठ आढावा घेऊन शासनाकडे प्रस्ताव पाठवावा, अशी मागणी खासदार निलेश लंके यांनी जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांच्याकडे केली आहे.

जिल्ह्यात यंदा खरीप हंगामात मोठ्या क्षेत्रावर पेरणी झाली आहे. कृषी विभागाच्या ३ सप्टेंबरच्या अहवालानुसार, ७ लाख १२ हजार ४८७ हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर खरीप पेरणी झाली असून त्यापैकी सुमारे २ लाख १ हजार ८०० हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनची पेरणी झाली आहे. मात्र पिकांच्या वाढीच्या तसेच शेंगा भरण्याच्या निर्णायक कालावधीत पावसाने मोठी ओढ दिल्याने सोयाबीन पिवळे पडणे, फुलगळ होणे, शेंगा न भरणे आणि पीक करपणे यासारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत.

पावसाच्या खंडाचा परिणाम ■ पान ४ वर

# पारनेर येथे बेकायदा मावा बनवणाऱ्या अड्ड्यावर छापा

## एलसीबीच्या कारवाईत एक लाखाहून अधिक मुद्देमाल जप्त, एकावर गुन्हा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** पारनेर शहरात छुप्या पद्धतीने चालणाऱ्या अवैध मावा विक्री आणि निर्मितीच्या अड्ड्यावर अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेने छापा टाकून एका १९ वर्षीय तरुणाला ताब्यात घेतले. या कारवाईत मावा बनवण्याच्या इलेक्ट्रिक मशिनसह एकूण १ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथक पारनेर हद्दीत गस्त घालत असताना पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, भाळवणी येथील अमन सुलतान तांबोळी हा हॉटेल रुचिराच्या पाठीमागील खोलीमध्ये इलेक्ट्रिक मशिनच्या साहाय्याने सुगंधित तंबाखू, चुना आणि सुपारीचे मिश्रण करून मावा तयार करत आहे.

माहिती मिळताच पोलिसांनी त्या खोलीवर छापा टाकला. त्यावेळी आरोपी तयार केलेला मावा प्लास्टिकच्या पुड्यांमध्ये भरताना रंगेहाथ पकडला गेला. पोलिसांनी तात्काळ अमन सुलतान तांबोळी (वय १९,

■ पान ४ वर

# प्यारे खान यांनी प्रशासनाचे वकीलपत्र घेण्याची आवश्यकता नव्हती!

## व्हिडिओ व वृत्तपत्रीय पुरावे असताना ''नागरी सुविधा बंद नव्हत्या'' हा निर्वाळा कशाच्या आधारावर?; न्यायासाठी उच्च न्यायालयात दाद मागणार शाकीर शेख

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** मुकुंदनगरमधील नागरी सुविधा बंद करण्याबाबत अहिल्यानगर महानगरपालिका कामगार युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी जाहीरपणे भूमिका मांडली होती. युनियनच्या आंदोलनाची भाषणे आणि व्हिडिओ यूट्यूबवर उपलब्ध असून, ''मुकुंदनगरच्या सर्व नागरी सुविधा बंद'', ''कामगार युनियनचा बेमुदत कामबंद'' आणि ''मुकुंदनगरमधील सेवा बंद ठेवणार'' अशा स्पष्ट मथळ्यांसह वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्यांनी बातम्या प्रसिद्ध केल्या आहेत. असे असतानाही महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी कोणतीही स्वतंत्र पडताळणी न करता ''मुकुंदनगरमध्ये नागरी सुविधा बंद नव्हत्या; प्रशासनाला बदनाम करण्याचा प्रयत्न होत आहे,'' असे विधान कोणत्या आधारावर केले, असा सवाल सामाजिक कार्यकर्ते शाकीर शेख यांनी उपस्थित केला आहे.

प्यारे खान हे मुकुंदनगरमधील नागरिकांचे म्हणणे ऐकून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आले होते. मात्र त्यांनी प्रत्यक्ष बाधित नागरिकांशी चर्चा न करता काही नगरसेवक आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून मिळालेली माहिती प्रसारमाध्यमांसमोर मांडली. प्रशासनाला स्वतःची बाजू मांडण्यासाठी सक्षम अधिकारी, जनसंपर्क विभाग आणि स्वतंत्र कायदेशीर यंत्रणा उपलब्ध आहे. त्यामुळे अल्पसंख्याक आयोगाच्या अध्यक्षांनी प्रशासनाचे वकीलपत्र घेऊन त्याची बाजू मांडण्याची कोणतीही आवश्यकता नव्हती, असे शेख यांनी म्हटले आहे.

**वृत्तपत्रीय बातम्या आणि व्हिडिओ काय सांगतात?**

८ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या वृत्तपत्रीय बातमीत महानगरपालिका कामगार युनियनने आंदोलन केल्याचे तसेच मुकुंदनगरमधील स्वच्छता, पाणीपुरवठा, दिवाबत्ती आणि आरोग्यसेवा बंद करण्याचा इशारा दिल्याचे स्पष्टपणे नमूद आहे. युनियन पदाधिकाऱ्यांची भाषणे आणि मुकुंदनगरच्या नागरी सेवांवर बहिष्कार टाकण्याच्या भूमिकेशी संबंधित व्हिडिओ आजही यूट्यूब व समाजमाध्यमांवर उपलब्ध आहेत.

एकीकडे युनियनची जाहीर भाषणे, आंदोलनाचे व्हिडिओ आणि प्रसिद्ध वृत्तपत्रीय बातम्या उपलब्ध असताना दुसरीकडे ''असा प्रकार घडलेलाच नाही'' असे सांगणे वस्तुस्थितीशी विसंगत आहे. हे सर्व पुरावे अध्यक्षांनी पाहिले होते का? संबंधित नागरिकांचे म्हणणे ऐकले होते का? महानगरपालिकेच्या अधिकृत अभिलेखांची पडताळणी केली होती का? या प्रश्नांची उत्तरे आयोगाने देणे आवश्यक असल्याचे शेख यांनी स्पष्ट केले.

**आयोगाच्या सचिवांनी मागविला चौकशी व कार्यवाहीचा अहवाल**

मुकुंदनगर, फकीरवाडा आणि दर्गादायरा भागांतील नागरी सेवांवरील बहिष्कार, कामगार युनियनचे आंदोलन आणि महापालिका प्रशासनाच्या भूमिकेबाबत महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग आणि नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांकडे

■ पान ४ वर



## दै. आकर्षण निवडक

### सत्यशोधक अण्णाभाऊ साठे स्मारक प्रतिष्ठान च्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन



अहिल्यानगर- आदिवासी शेतकरी खंडू बहिरू कोळी राहता पुणेवाडी ता पारनेर जिल्हा अहिल्यानगर येथे रहिवासी असून ते भटक्या विमुक्त आदिवासी समाजाचे असल्याने त्यांना महाराष्ट्र शासनाने सन १९३० आपला प्रपंच चालवण्यासाठी महाराष्ट्र शासन जमीन गट नंबर २४ ९७ ही दिली तेव्हापासून ते जमीन कसून आपला प्रपंच चालवत होतो पण जमीन कोरडवाहू असल्याने व पावसावर शेती अवलंबून असल्याने पाऊस न झाल्यास पीक धान्य येत नाही व त्यामुळे उपासमारीची वेळ येत होती त्यामुळे खंडू यांना दोन मुले असल्याने या मोलमजुरी करून आपला प्रपंच चालवत होते परंतु मॉल मजुरी मिळत नाही व मुलांचे शिक्षण होत नाही परिस्थिती अत्यंत बिकट असल्याने त्यांनी आपली उपजीविका भागवण्यासाठी पुणेवाडी गाव सोडून बाहेरगावी सातारा या ठिकाणी स्थलांतर केले तेथे पण पती-पत्नीने मोलमजुरी करून आपल्या मुलांना शिक्षण दिले त्यानंतर ११ जानेवारी १९७० रोजी मृत्यू झाला त्यानंतर पती सोनाबाई खंडू कोळी यांचा ३ डिसेंबर २००१ रोजी मृत्यू झाला या दोघांच्या मृत्यूमुळे दुःखातून सावरण्यासाठी मुलगा शिवाजी खंडू कोळी व मुलगी हौसाबाई सोनबा मोरे यांना वेळ मिळाला नाही त्यानंतर आपल्या वडिलांना मिळालेल्या शासकीय जमीन गट नंबर २४ ९७ पुणेवाडी येथील वारस नोंद लावण्यासाठी तहसीलदार पारनेर येथे गेले असता त्यांना समजले की या शासकीय जमिनीवर गावातील ठकाराम बाबुराव ठाणगे व शरद खांडगे राहता कुंभारवाडी ता पारनेर जिल्हा अहिल्यानगर यांनी आदिवासी कोळी समाजाच्या जमिनीवर पीक पाण्याची नोंद लावली तेव्हा त्यांना विचारणा केली असता ते म्हणाले की आदिवासी लोक आमचे काहीच करू शकत नाही अन्यथा आपण जीव मारून टाकू अशा प्रकारची जीवा मारण्याची धमकी दिली आहे आमची आदिवासी जमीन असताना तहसीलदार सर्कल तलाठी यांनी पीक पाण्याचे नोंद कोणत्या प्रकारे लावण्यात आली याची चौकशी करून त्यांचे नाव रद्द करण्यात यावे व पुढील आदिवासी शिवाजी खंडू कोळी व मुलगी हौसाबाई सोनवा मोरे यांचे नावाची वारस नोंद करण्यात यावी या मागणीचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी यांना देण्यात आले तसेच स्कीम उतारा मृत्यूचे प्रमाणपत्र सन २०१५ चा सातबारा उतारा सन २०२६ चा सातबारा उतारा देखील पुरावा म्हणून देण्यात आलेला आहे.

### जिल्हा ग्राहक आयोगात आता आभासी सुनावणीची सुविधा

अहिल्यानगर- ग्राहकांच्या तक्रारींच्या सुनावणीची प्रक्रिया अधिक सुलभ, गतिमान आणि आधुनिक करण्याच्या दृष्टीने अहमदनगर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगामध्ये आता आभासी पद्धतीने (व्हिडिओ कॉन्फरन्स) सुनावणीची सुविधा उपलब्ध होणार आहे. महाराष्ट्रात जिल्हास्तरावरील ग्राहक आयोगामध्ये प्रथमच ही सुविधा सुरू होत असून, तिचे उद्घाटन शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता टीव्ही सेंटर येथील प्रशासकीय इमारतीतील ग्राहक आयोगाच्या कार्यालयात होणार आहे. राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबईचे अध्यक्ष मुकेश व्ही. शर्मा यांच्या हस्ते या आभासी सुनावणी सुविधेचे उद्घाटन करण्यात येणार आहे. यावेळी राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबईच्या सदस्य पूनम महर्षी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. ग्राहकांना त्यांच्या तक्रारींचे निवारण करून घेण्यासाठी न्यायव्यवस्थेपर्यंत सहज पोहोचता यावी, तसेच सुनावणीच्या प्रक्रियेत वेळ आणि श्रमाची बचत व्हावी, या उद्देशाने ग्राहक आयोगाच्या कामकाजात तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून अहमदनगर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगात व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून सुनावणीची सुविधा सुरू करण्यात येत आहे ग्राहकांच्या तक्रारींच्या निवारणासाठी देशात त्रिस्तरीय ग्राहक आयोगाची रचना करण्यात आली आहे. जिल्हास्तरावर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, राज्यस्तरावर राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, तर राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोग कार्यरत आहे. ग्राहकांना सदोष वस्तू किंवा मूल्य देऊन घेतलेल्या सेवेमध्ये त्रुटी आढळल्यास संबंधित ग्राहक आयोगाकडे तक्रार दाखल करता येते. ग्राहकाने एखाद्या वस्तूसाठी किंवा सेवेसाठी पैसे दिल्यानंतर त्याला अपेक्षित दर्जाची वस्तू अथवा सेवा मिळाली नाही, वस्तूमध्ये दोष आढळला किंवा सेवेमध्ये त्रुटी राहिली, अशा प्रकरणांमध्ये ग्राहक आयोगामार्फत तक्रारींची सुनावणी केली जाते. तक्रारीची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून संबंधित ग्राहकाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न आयोगाच्या माध्यमातून केला जातो.

# संवर्धनाच्या कामात ६०० ते ७०० वर्षे पुरातन मूर्तीचे प्रकटीकरण!

**स्वयंभू शनि मारुती मंदिरात दर्शनासाठी भाविकांचा ओघ; प्राचीन मूर्तीचे दर्शन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**





**अहिल्यानगर–** शनि महाराजांच्या मूर्तीच्या संवर्धनाचे काम सुरू असतानाच तब्बल ६०० ते ७०० वर्षे पुरातन प्राचीन मूर्तीचे प्रकटीकरण झाल्याने श्री रामचंद्र खुंट परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले. या दुर्मीळ प्राचीन मूर्तीच्या दर्शनासाठी भाविकांनी मंदिरात मोठी गर्दी केली. भाविकांनी श्रद्धा आणि भक्तिभावाने मूर्तीचे दर्शन घेतले.

शनि गल्लीतील स्वयंभू शनि मारुती मंदिरात घडलेल्या या घटनेची माहिती परिसरात पसरताच दर्शनासाठी भाविकांची गर्दी वाढली. प्राचीन मूर्तीचे दर्शन घेण्यासाठी दिवसभर भाविकांचा ओघ सुरू होता. भाविकांची श्रद्धा आणि दर्शनासाठी होत असलेली गर्दी लक्षात घेता उद्याही या पुरातन मूर्तीचे दर्शन भाविकांना घेता येणार आहे.

**मूळ शनि महाराजांच्या मूर्तीचे संवर्धन**

मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम सध्या प्रगतीपथावर असून, मूळ शनि महाराजांच्या मूर्तीचे जतन व दीर्घकाळ संवर्धन व्हावे, या उद्देशाने मूर्तीवर वज्रलेप करण्यात येत आहे. कुशल व तज्ज्ञ कारागिरांकडून वज्रलेपनाचे काम सुरू आहे. वज्रलेप विधी पूर्ण झाल्यानंतर शनि महाराजांच्या मूर्तीची पुनर्प्रतिष्ठा करण्यात येणार आहे.

धार्मिक विधी मार्गदर्शनाखाली मंदिरातील संवर्धनाचे काम, वज्रलेप विधी तसेच विविध धार्मिक कार्यक्रम मंगल भक्त सेवा मंडळाचे अध्यक्ष प.पू. गुरुवर्य श्री विश्वेश्वर स्वामी महाराज (श्री राजाभाऊ कोठारी) यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मंदिराचे मुख्य पुजारी श्री ओम पांडे यांच्या निर्देशानुसार संपन्न होत आहेत.

प्राचीन मूर्तीचे प्रकटिकरण हा भाविकांच्या श्रद्धेचा विशेष क्षण ठरला असून, या धार्मिक कार्यात सर्व भाविकांनी सहभागी व्हावे, प्राचीन मूर्तीचे दर्शन घ्यावे आणि शनि महाराजांची कृपाप्राप्ती करून घ्यावी, असे नम्र आवाहन मंदिराच्या वतीने करण्यात आले आहे.

# दिवाळीपूर्वी अहिल्यानगर मनपा कामगार–कर्मचाऱ्यांना ११ हजार २५० रुपयांचे सानुग्रह अनुदान

**दिवाळीच्या ८ दिवस आधी मिळणार सानुग्रह अनुदान । आ. संग्राम जगताप, महापौर ज्योती गाडे, आयुक्त यशवंत डांगे यांचे युनियनकडून आभार**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेतील कामगार–कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी एक रकमी

रु. ११ हजार २५० सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कामगार–कर्मचाऱ्यांना बोनस व सानुग्रह अनुदान मिळावे, या मागणीसाठी अहिल्यानगर महानगरपालिका कामगार युनियनच्या वतीने दि. ७ ऑगस्ट २०२६ रोजी महानगरपालिका आयुक्तांना संपाची नोटीस देण्यात आली होती.

या नोटीसीतील मागण्यांबाबत चर्चा करण्यासाठी महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी युनियनच्या शिष्टमंडळासोबत बैठकीचे आयोजन केले. या बैठकीमध्ये युनियनने केलेल्या नोटीसीतील सर्व मागण्यांबाबत सविस्तर साधक–बाधक चर्चा करण्यात आली.

या चर्चेनंतर महानगरपालिकेतील पात्र कामगार–कर्मचाऱ्यांना दिवाळी सणाच्या ८ दिवस अगोदर ११ हजार २५० रुपयांची रक्कम एकरकमी अदा करण्याबाबत उभयपक्षी अंतिम निर्णय घेण्यात आला. तसेच कामगारांच्या इतर मागण्यांबाबतही बैठकीमध्ये सकारात्मक चर्चा करण्यात आली.

यासोबतच कामगारांना देण्यात येणारा सणअग्रीम दिवाळीपूर्वी १५ दिवस अगोदर अदा करण्याबाबत देखील चर्चा करण्यात आली. कामगारांची थकित देणी देण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. वसुली तसेच इतर मार्गाने पैसे उपलब्ध होतील, त्याप्रमाणे कामगारांची थकित देणी अदा केली जातील, असे बैठकीमध्ये ठरविण्यात आले.

या संयुक्त बैठकीमध्ये युनियनच्या वतीने अध्यक्ष जितेंद्र सारसर, सरचिटणीस आनंदराव वायकर, बाबासाहेब मुदगल, कार्याध्यक्ष नंदकुमार नेमाने, बलराज गायकवाड, विठ्ठल उमाप, महादेव कोतकर, बाबासाहेब राशिनकर, उपाध्यक्ष राहुल साबळे, अमोल लहारे, बाळासाहेब व्यापारी, विजय कोतकर, औंकार कराळे तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते.

महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त यशवंत डांगे, उपायुक्त मेहेर लहारे, आस्थापना प्रमुख गणेश लयचेट्टी यांच्या उपस्थितीत कामगारांच्या मागण्यांबाबत अंतिम निर्णय घेण्यात आला.

बैठकीमध्ये युनियनच्या वतीने सरचिटणीस आनंदराव वायकर यांनी कामगारांना सानुग्रह अनुदान देण्याबाबतचा निर्णय लवकर घेतल्याबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच याबाबत सकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल मा. आ. संग्राम जगताप, महापौर ज्योती गाडे, आयुक्त यशवंत डांगे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, स्थायी समिती सभापती सुभाष लोंढे, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपाली बारस्कर, उपसभापती वर्षा सानप, सर्व नगरसेवक, नगरसेविका तसेच महानगरपालिकेतील अधिकारी यांचे युनियनच्या वतीने आभार मानण्यात आले.

कामगार–कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी सानुग्रह अनुदान मिळणार असल्याने कामगार वर्गामध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# शाडू मातीपासून विद्यार्थ्यांनी साकारल्या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती

**। भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमध्ये ६०० विद्यार्थ्यांचा सहभाग**

**। पर्यावरणपूरक गणेशोत्सवातून स्वच्छ, सुंदर, हरित अहिल्यानगर साकारू – आयुक्त यशवंत डांगे**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची असून, पर्यावरण संवर्धनासाठी यंदाचा गणेशोत्सव शाडू मातीच्या गणेशमूर्तीची स्थापना करून साजरा करण्याचा संकल्प करूया, असे आवाहन अहिल्यानगर महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी केले. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्तींमुळे जलस्रोत, विहिरी, तलाव व नद्यांचे प्रदूषण होऊन पर्यावरणाची मोठी हानी होते. त्यामुळे शाडू मातीच्या गणेशमूर्ती पर्यावरणासाठी फायदेशीर असून, त्याबाबत महापालिकेच्या माध्यमातून शहरात मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

अहिल्यानगर महानगरपालिका व भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने माझी वसुंधरा अभियानांतर्गत विद्यार्थ्यांसाठी शाडू मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनविण्याची कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेत शाळेतील तब्बल ६०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेत गणेशाच्या विविध रूपातील सुंदर मूर्ती साकारल्या. विद्यार्थ्यांनी भक्तिभावाने स्वतःच्या हाताने गणेशमूर्ती तयार करून आपल्या घरी त्यांची स्थापना करण्याचा संकल्प केला.

यावेळी आयुक्त यशवंत डांगे, शिल्पकार प्रमोद कांबळे, संस्थेच्या प्रमुख कार्यवाहक छायाताई फिरोदिया, नगरसेवक मनोज कोतकर, पर्यावरणदूत सुरेश खामकर, प्राचार्य कैलास साबळे, मूर्तिकार बालाजी वल्लाल, घनकचरा विभाग प्रमुख प्रशांत रामदिन, सतीश गुगळे यांच्यासह पालक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे. विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे उज्ज्वल भविष्य असून, त्यांच्यामध्ये पर्यावरण संवर्धनाची भावना निर्माण करण्यासाठी अशा विविध उपक्रमांचे आयोजन होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याबरोबरच पर्यावरणाचे रक्षण करण्याचा संदेश या उपक्रमातून दिला जात आहे. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती पर्यावरणासाठी हानिकारक असून, त्याऐवजी शाडू मातीच्या गणेशमूर्तींचा वापर मोठ्या प्रमाणात झाला पाहिजे.

पावसाळ्यानंतर तसेच गणेशोत्सवाच्या काळात जलप्रदूषण होऊ नये यासाठी प्रत्येकाने पर्यावरणपूरक गणेशमूर्तीची स्थापना करावी. आपल्या घरापासून पर्यावरण संवर्धनाची सुरुवात केल्यास त्यातून मोठी लोकचळवळ उभी राहू शकते. स्वच्छ, सुंदर व हरित अहिल्यानगर साकारण्यासाठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहनही आयुक्त डांगे यांनी केले.

शिल्पकार प्रमोद कांबळे म्हणाले की, महापालिकेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी जनजागृती केली जात आहे. हा उपक्रम कौतुकास्पद असून, त्यातून भविष्यात पर्यावरण संवर्धनाचे काम अधिक प्रभावीपणे होईल. ग्लोबल वॉर्मिंगमुळे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी झाली असून, त्याचे दुष्परिणाम मानवी जीवनावर होताना दिसत आहेत. त्यामुळे पर्यावरणाचे संवर्धन ही काळाची गरज बनली आहे. प्रत्येकाने शाडू मातीच्या गणपतीची स्थापना करून पर्यावरण संवर्धनाच्या कार्यात योगदान द्यावे, असे त्यांनी सांगितले.

छायाताई फिरोदिया म्हणाल्या की, पर्यावरणाच्या रक्षणासाठी प्रत्येकाने स्वतःपासून शाडू मातीच्या गणेशमूर्तीची स्थापना करावी. आम्ही अनेक वर्षांपासून भक्तिभावाने शाडू मातीच्या गणपतीची स्थापना करत आहोत.

# शिक्षकांच्या प्रेरणा व ज्ञानातून विद्यार्थ्यांची स्वप्ने साकार : अशोक गुर्जर

**'ब्रेड ऑफ लाईफ बोल फाउंडेशन'तर्फे भिंगारमधील शिक्षकांचा शाल, श्रीफळ व गुलाबपुष्प देऊन गौरव**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शिक्षक हे केवळ विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञान देणारे नसून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची, विचारांची आणि भविष्यातील वाटचालीची भक्कम पायाभरणी करणारे शिल्पकार आहेत. शिक्षकांच्या प्रेरणा, मार्गदर्शन आणि ज्ञानाच्या बळावर विद्यार्थ्यांची स्वप्ने साकार होतात. समाजाची सकारात्मक बांधणी करण्यामध्ये शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, प्रत्येक विद्यार्थ्याने शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेत आत्मविश्वासाने यशाची वाटचाल करावी, असे प्रतिपादन अहिल्यानगर येथील नामांकित चार्टर्ड अकाउंटंट अशोक गुर्जर यांनी केले.

'ब्रेड ऑफ लाईफ बोल फाउंडेशन'च्या वतीने शिक्षक गौरव दिनानिमित्त भिंगार येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर माध्यमिक विद्यालय, नूतन माध्यमिक विद्यालय, बालभवन व बालवाडी येथे कार्यरत असलेल्या मान्यवर गुरुजनांचा सन्मान करण्यात आला. अशोक गुर्जर व त्यांच्या पत्नी सौ. माधुरी गुर्जर यांच्या हस्ते शिक्षकांना शाल, श्रीफळ व गुलाबपुष्प देऊन कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या उपक्रमाला शिक्षक, विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अशोक गुर्जर होते. यावेळी सौ. माधुरी गुर्जर, फाउंडेशनच्या सचिव सौ. शोभा पाटोळे, अध्यक्ष जोसेफ पाटोळे, शाळेचे मुख्याध्यापक संजय शिंदे, शिक्षकवृंद तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला नमन करून झाली. त्यानंतर प्रमुख पाहुणे अशोक गुर्जर , सौ. माधुरी गुर्जर, फाउंडेशनच्या सचिव सौ. शोभा पाटोळे, मुख्याध्यापक संजय शिंदे आणि विद्यार्थी अर्पिता भिंगारदिवे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात फाउंडेशनच्या सचिव सौ. शोभा पाटोळे यांनी शिक्षकांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित केले. शिक्षक हे देश, समाज आणि कुटुंबाच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावत असून, विद्यार्थ्यांच्या आयुष्याला योग्य दिशा देण्याचे कार्य ते सातत्याने करतात. त्यामुळे शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

फाउंडेशनचे अध्यक्ष जोसेफ पाटोळे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी विद्यार्थी साई कोष्टी याने मनोगत व्यक्त करताना भावी यशाच्या वाटचालीत शिक्षकांचे मार्गदर्शन किती महत्त्वाचे आहे, याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

अशोक गुर्जर यांनी आपल्या मनोगतात शिक्षक हा समाजाच्या सकारात्मक बांधणीतील महत्त्वाचा घटक असल्याचे सांगितले. शिक्षक विद्यार्थ्यांच्या मनात आत्मविश्वास, शिस्त, संस्कार आणि ध्येय निर्माण करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षकांनी दिलेल्या मार्गदर्शनाचा योग्य उपयोग करून आपल्या जीवनात यश संपादन करावे, असे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेची भीती मनातून काढून टाकावी. सातत्याने प्रयत्न, सराव आणि आत्मविश्वासाच्या जोरावर कोणत्याही भाषेवर प्रभुत्व मिळविता येते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मुख्याध्यापक संजय शिंदे यांनी मनोगत व्यक्त करताना 'ब्रेड ऑफ लाईफ बोल फाउंडेशन'च्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. समाजातील विविध घटकांना मदतीचा हात देण्याबरोबरच शिक्षकांचा सन्मान करून त्यांच्या कार्याची दखल घेण्याचा फाउंडेशनचा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षकांचा सन्मान हा प्रत्यक्षात शिक्षण क्षेत्राचा आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा सन्मान असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी शिक्षिका स्नेहल लवांडे यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या विचारांमधून शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी, असे मार्गदर्शन केले. डॉ. राधाकृष्णन यांनी शिक्षण क्षेत्रात दिलेले योगदान आणि शिक्षक म्हणून त्यांचे कार्य याबाबत त्यांनी उपस्थितांना माहिती दिली.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित शिक्षकांचा शाल, श्रीफळ व गुलाबपुष्प देऊन गौरव करण्यात आला. शिक्षकांचा सन्मान होत असताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरही आनंद आणि अभिमान दिसून आला. शिक्षक दिनानिमित्त आयोजित या उपक्रमामुळे गुरु–शिष्य नात्यातील कृतज्ञता आणि आपुलकी अधिक दृढ झाली.

# राष्ट्रवादीच्या महिला आघाडीला नवी ऊर्जा; शहर कार्यकारिणीत नव्या नियुक्त्या



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अहिल्यानगर शहर महिला आघाडीची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने शहर महिला अध्यक्ष अर्चना गायकवाड यांनी प्रदेश अध्यक्षा रोहिणीताई खडसे यांच्या मान्यतेने विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या.

खासदार निलेश लंके, जिल्हाध्यक्ष सीताराम काकडे, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष अथर खान, कार्याध्यक्ष समीर पठाण, नगरसेवक योगीराज गाडे, जिल्हा उपाध्यक्ष मतीन शेख, गारुडकर सर, रामभाऊ वाणी, सरपंच शरद पवार, रामभाऊ झीने, शहर कार्याध्यक्ष अजहर शेख, असिर शेख आदींच्या उपस्थितीत नियुक्तीपत्रे देण्यात आले.

अहिल्यानगर शहर जिल्हा उपाध्यक्षपदी वेणूबाई विठ्ठल वाणी, महासचिवपदी वर्षा सांतवन सगलगिरे, शहर सचिवपदी ज्योती भोसले व अलका वाकडे, तर सहसचिवपदी अर्चना दत्तू शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली.

महिलांना राजकीय, सामाजिक व संघटनात्मक क्षेत्रात अधिकाधिक संधी देण्याच्या पक्षाच्या भूमिकेनुसार या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांवर पक्षाची विचारधारा जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासह महिलांच्या विविध प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. महिला शक्तीला संघटित करून पक्षाची ताकद बूथस्तरापर्यंत वाढविण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

'महिला सशक्तीकरण, संघटन बळकटीकरण आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी संघर्ष' या भूमिकेतून आगामी काळात महिला आघाडीच्या माध्यमातून विविध सामाजिक व संघटनात्मक उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### श्री बडीसाजन ओसवाल युवक संघ व नगर जल्लोष (ट्रस्ट) यांच्या संयुक्त विद्यमाने १३ सप्टेंबरला गणपती बनवा कार्यशाळा

अहिल्यानगर- श्री. बडीसाजन ओसवाल युवक संघ आणि नगर जल्लोष (ट्रस्ट) यांच्या संयुक्त विद्यमाने, प्रसिद्ध शिल्पकार श्री. बालाजी वल्लाल यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या उद्देशाने, शाडूमातीपासून गणपती बाप्पाची मूर्ती बनवण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.ही कार्यशाळा रविवार दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११.३० ते १.३० या वेळेत ''बडीसाजन ओसवाल भवन'', आनंद ऋषी हॉस्पिटल शेजारी, स्टेशन रोड, अहिल्यानगर येथे होणार आहे. या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी प्रवेश फी १०० रुपये असून, नोंदणी आवश्यक आहे. कार्यशाळेत मूर्ती बनवण्यासाठी लागणारी शाडू माती आयोजकांकडून मोफत दिली जाईल. सहभागी होणाऱ्यांनी मूर्ती बनवण्यासाठी छोटा पाट, रुमाल आणि पाण्याची बॉटल सोबत आणणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी संपर्क सागर बोगा ९८६०६१२०४५,मनोजकुमार चोपडा - ९०२८७११६६६, दीपक गुंडू ९९२२१४०१२०,सिद्धार्थ शेटीया - ८०८७७३१९१७. या उपक्रमाला रेडिओ सिटी (९१.१ एफएम) आणि जागरण इनिशिएटिव्हचे रेडियो पार्टनर म्हणून सहकार्य लाभले आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी या कार्यशाळेत सहभागी होऊन पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश सर्वत्र पोहोचवावा, असे आवाहन ही आयोजकांनी केले आहे.

### श्रावणी सोमवारी हरदिन मॉर्निंग ग्रुपचा स्वच्छतेचा जागर




अहिल्यानगर - चौथ्या श्रावणी सोमवारचे औचित्य साधून हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने डोंगरगण (ता. नगर) येथील श्री रामेश्वर महाराज मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबवून बेलाच्या झाडाची लागवड करण्यात आली. यावेळी भाविकांसाठी खिचडी व फराळ वाटप करण्यात आले. धार्मिक श्रद्धेसोबतच सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत ग्रुपच्या सदस्यांनी मंदिर परिसर स्वच्छ केला. महिलांच्या हस्ते बेलाच्या रोप लावून 'स्वच्छ परिसर, हरित परिसर'चा संदेश देण्यात आला. श्रावणी सोमवारनिमित्त रामेश्वर महाराज मंदिरात दर्शनासाठी आलेल्या भाविकांची मोठी गर्दी केली होती. या पार्श्वभूमीवर हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या सदस्यांनी मंदिर परिसरातील स्वच्छता केली. परिसरातील कचरा संकलित करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली. यानंतर महिलांच्या हस्ते विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. वृक्षारोपणातून पर्यावरण रक्षणाचा संदेश देत लावलेल्या रोपांचे संगोपन करण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला. दर्शनासाठी आलेल्या भाविकांना खिचडी व फराळाचे वाटप करण्यात आले. यावेळी हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, राजश्री राहींज, प्रांजली सपकाळ, सचिन चोपडा, डोंगरगणचे सरपंच कैलास पठारे, चेअरमन बाबासाहेब दाणे, रामेश्वर मंदिराचे विश्वस्त दत्तात्रेय पुजारी, संतोष लुनिया, जहीर सय्यद, ताराचंद ठोकळ, दीपक मेहतानी, जोगिंदरसिंग, दिलीप ठोकळ, सर्वेश सपकाळ, सुंदर पाटील, अभिजीत सपकाळ, उमाशंकर सिंग, मुन्ना वाघस्कर, योगेश चौधरी, सखाराम अळकुटे, दशरथराव मुंडे, विठ्ठल राहिंज, रामनाथ गर्जे, अनिल हळगावकर, अविनाश जाधव, राजेंद्र चंगेडिया, श्रीरंग देवकुळे, राजू शेख, शशिकांत पवार, भारत कनोजिया, सुधीर कपाळे, अशोक पराते, सुभाष पेंडुरकर, शिरीष पोटे, अविनाश पोतदार, प्रकाश देवळालीकर, रमेश वराडे, इंजि. अनिल सोळसे, राजेश तनपुरे, जालिंदर अळकुटे, दिलीप गुगळे आदी उपस्थित होते. संजय सपकाळ म्हणाले की, ''हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या माध्यमातून वर्षभर जिल्ह्याच्या विविध भागांत सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबविले जातात. धार्मिक उत्सव आणि सण हे समाजाला एकत्र आणण्याचे माध्यम आहेत. त्यामुळे अशा प्रसंगी केवळ धार्मिक विधी न करता समाजासाठी काहीतरी सकारात्मक करण्याचा आमचा प्रयत्न असतो.

# अल्पसंख्यांक आयोगाने योजनांची तत्काळ प्रभावीपणे अंमलबजावणी करावी : इंजि.यश शहा

### अल्पसंख्याक योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी इंजि. यश शहा यांचे निवेदन; आयोगाचे अध्यक्ष प्यारे जिया खान यांच्याकडे विविध मागण्या

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अल्पसंख्याक समाजासाठी शासनाच्या विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करून त्याचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवावा, तसेच प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, या मागणीसाठी मिशन सेफ विहार ग्रुपचे अध्यक्ष इंजि. यश प्रमोद शहा यांनी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष तथा मंत्री माननीय प्यारे जिया खान यांच्याकडे सविस्तर निवेदन सादर केले. यावेळी मिशन सेफ विहार ग्रुपच्या वतीने जैन गुरु भगवंतांना विहारादरम्यान संपूर्ण महाराष्ट्रात पोलीस सुरक्षा उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आयोगाचे अध्यक्ष प्यारे जिया खान यांचे विशेष आभार मानण्यात आले. जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, महाराष्ट्र शासन, अल्पसंख्याक आयोग, मंत्रालय आणि प्रशासनाने घेतलेल्या सकारात्मक भूमिकेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यासंदर्भातील आभारपत्र तसेच वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातम्याही निवेदनासोबत जोडण्यात आल्या.

यानंतर अल्पसंख्याक योजनांशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्न आणि मागण्यांबाबत सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. प्यारे जिया खान यांनी या निवेदनाची तत्काळ दखल घेत सकारात्मक प्रतिसाद दिला. संबंधित प्रश्नांवर लवकरच प्रभावीपणे कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले. तसेच संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना करण्याचे निर्देशही दिले.



निवेदनात जैन साधू-साध्वीजी व गुरु भगवंतांना विहारादरम्यान अधिक प्रभावी पोलीस सुरक्षा मिळावी, यासाठी राज्यस्तरावर आदेश पारित करावेत, अशी मागणी करण्यात आली. तसेच विहारधामसाठी आवश्यक जागा आणि निधी उपलब्ध करून द्यावा, अशीही मागणी करण्यात आली.

अल्पसंख्याक समाजातील गंभीर आजारांनी त्रस्त रुग्णांसाठी, विशेषतः कॅन्सर व इतर गंभीर आजारांच्या उपचारासाठी, जिल्हा अल्पसंख्याक निधी अथवा मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून रुग्णाच्या नावे विशेष आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली. पैशाअभावी कोणत्याही गरजू रुग्णाचा उपचार थांबू नये, यासाठी विशेष मदत व्यवस्था उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.

मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या विविध कर्ज योजना निधीअभावी प्रभावीपणे राबवल्या जात नसल्याच्या तक्रारींची तातडीने चौकशी करून या योजना प्रत्यक्षात सुरू कराव्यात. तसेच राज्यातील सर्व जिल्हा प्रशासनांना याबाबत आवश्यक सूचना द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली. याशिवाय अल्पसंख्याक समाजातील नागरिकांना विविध शासकीय योजनांसाठी आवश्यक असलेले अल्पसंख्याक प्रमाणपत्र सहज उपलब्ध करून द्यावे, विविध अल्पसंख्याक योजनांसाठीची उत्पन्न मर्यादा ८ लाख रुपयांपर्यंत लागू करावी, जिल्हा अल्पसंख्याक समितीवरील अशासकीय सदस्यांची कार्यकारिणी तातडीने गठित करावी, अशा मागण्या करण्यात आल्या. अल्पसंख्याक योजनांचा पाठपुरावा करण्यासाठी आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा स्तरावर 'एक खिडकी योजना' सुरू करावी त्याचे कार्यालय जिल्हाधिकारी कार्यालयात सुरू करण्यात यावे अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली. इंजि. यश प्रमोद शहा २०१४ पासून जैन समाजाचे प्रतिनिधी जीनशासन सेवक म्हणून विविध सामाजिक संघटनांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील अल्पसंख्याक समाजाला शासनाच्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी कार्यरत आहोत. त्यांच्या कार्याची दखल घेत लहान वयात सामाजिक कार्य करत असल्याबद्दल विशेष कौतुक यावेळी मीटिंग मध्ये केले. आयोगाचे अध्यक्ष प्यारे जिया खान यांनी निवेदनातील मागण्यांची सकारात्मक दखल घेत संबंधित प्रश्नांवर आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याने, अल्पसंख्याक समाजाच्या प्रलंबित प्रश्नांना आता गती मिळण्याची अपेक्षा यश शहा यांनी यावेळी व्यक्त केली.

## रेव्हेन्यू सोसायटीची १०५ वी वार्षिक साधारण सभा उत्साहात संपन्न

### सभासदांसाठी १५ लाखांचा अपघात विमा व अल्प दरात कर्ज पुरवठा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** रेव्हेन्यू अँड रजिस्ट्रेशन डिपार्टमेंट्स गव्हर्नमेंट सर्व्हंट्स को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. अहिल्यानगर या संस्थेची सन २०२५-२६ ची १०५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच नवीन जिल्हाधिकारी कार्यालयातील नेहरू सभागृहात उत्साहात पार पडली. निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते हे या सभेच्या अध्यक्षस्थानी होते.

सभेची सुरुवात संस्थेचे सभासद गणेश नरोटे यांच्या मुली श्रावणी व श्रेयशी नरोटे यांच्या स्वागतगीताने झाली. या प्रसंगी संस्थेचे चेअरमन प्रवीण बोरुडे यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. संस्था सभासदांना मासिक पगारानुसार ४० लाख रुपयांपर्यंत ८.२५ % या अल्प दराने त्वरित कर्ज वाटप करत असून सभासदांच्या वर्गणी ठेवीवर ८ % दराने व्याज दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच यंदा संस्थेच्या खेळत्या भांडवलात भरीव वाढ झाली असून सभासदांचा प्रत्येकी १५ लाख रुपयांचा अपघात विमा उतरविल्याचे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात बोलताना निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांनी संस्थेचा कारभार पारदर्शक असल्याचे सांगत राबवल्या जाणाऱ्या योजनांचे कौतुक केले. कार्यकारी मंडळ सभासदांचे हित लक्षात घेऊन संस्थेचा प्रगती आलेख उंचावत असून संस्थेत थकबाकी नसल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

याप्रसंगी दादासाहेब गिते यांच्या शुभहस्ते सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा ट्रॉफी व बक्षीस देऊन तसेच सेवानिवृत्त सभासदांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी संघटनांचे पदाधिकारी संतोष तनपुरे, अक्षय फलके, गणेश जाधव, डॉ. मुकुंद शिंदे, रवि डिक्रुज, राजेंद्र आंधळे, संजय डोके, अशोक मासाळ, सुरेश राऊत, शुभम गुंजाळ व प्रसन्ना पाठक यांचाही सन्मान करण्यात आला.

## 'डीजे'मुक्त गणेशोत्सव साजरा करा




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** गणेशोत्सव २०२६ शांततेत व उत्साहात पार पाडण्यासाठी पैठण तहसील कार्यालयात गुरुवारी (ता. १०) समन्वय व शांतता समितीची बैठक घेण्यात आली. उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या बैठकीत गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांसह पोलीस पाटील, प्रतिष्ठित नागरिक व विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला.

पैठण, एम. पैठण, बिडकीन व पाचोड पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील गणेश मंडळांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच पदाधिकाऱ्यांना गणेशोत्सव नियमांचे काटेकोर पालन करून साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले. गणेशोत्सव 'डीजे'मुक्त वातावरणात पारंपरिक पद्धतीने साजरा करावा, ध्वनिप्रदूषणासह कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले. बैठकीस पोलीस उपअधीक्षक सोनाली पैकवार, पोलीस निरीक्षक महादेव गोमारे, सहायक पोलीस निरीक्षक सचिन पंडित, भरत मोरे यांच्यासह अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

## वराह जयंती मोठ्या उत्साहात साजरी करा - धर्मरक्षक संतोष ब्राम्हणे

### राष्ट्रीय श्रीराम संघाच्या वतीने समस्त हिंदू बांधवांना आवाहन

दैनिक आकर्षण । विशाल लोंढे

**कोपरगाव–** कोपरगाव : हिंदू धर्मातील विविध सण, उत्सव आणि धार्मिक परंपरांना विशेष महत्त्व असून, या परंपरांच्या माध्यमातून समाजामध्ये एकोपा, संस्कृतीची जपणूक आणि धार्मिक भावनेची वृद्धी होत असते. याच पार्श्वभूमीवर येणारी वराह जयंती समस्त हिंदू बांधवांनी मोठ्या उत्साहात, भक्तिभावाने आणि जल्लोषपूर्ण वातावरणात साजरी करावी, असे आवाहन राष्ट्रीय श्रीराम संघाचे धर्मरक्षक संतोष भाऊ ब्राम्हणे यांनी केले आहे.

भगवान विष्णू यांच्या दशावतारांपैकी वराह अवतार हा तिसरा अवतार मानला जातो. हिरण्याक्ष या असुराने पृथ्वीला रसातळात नेल्यानंतर भगवान विष्णूंनी वराहाचे रूप धारण करून पृथ्वीचे रक्षण केले, अशी धार्मिक मान्यता आहे. त्यामुळे वराह जयंतीला हिंदू धर्मात विशेष धार्मिक महत्त्व आहे. या दिवशी भगवान वराहाची पूजा, नामस्मरण आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. वराह अवताराच्या कथेतून धर्माचे रक्षण, अधर्माचा नाश आणि संकटाच्या काळात समाज व सृष्टीच्या रक्षणासाठी पुढे येण्याचा संदेश मिळतो. त्यामुळे वराह जयंती हा केवळ धार्मिक उत्सव न राहता आपल्या संस्कृतीशी आणि परंपरेशी जोडणारा दिवस म्हणूनही साजरा केला जावा, असे संतोष भाऊ ब्राम्हणे यांनी म्हटले आहे.



राष्ट्रीय श्रीराम संघ हा हिंदू समाजामध्ये धार्मिक व सांस्कृतिक जागृती, हिंदू सण-उत्सवांचे आयोजन, सामाजिक एकोपा आणि आपल्या परंपरांचे संवर्धन यासाठी कार्यरत असल्याचे संघाच्या पदाधिकाऱ्यांकडून सांगण्यात येते. विविध धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजातील बांधवांना एकत्र आणणे आणि तरुण पिढीला आपल्या संस्कृतीची ओळख करून देण्यावर संघाकडून भर दिला जात आहे.

याच उद्देशाने वराह जयंतीनिमित्तही हिंदू बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. प्रत्येकाने आपल्या कुटुंबासह या उत्सवात सहभागी होऊन भगवान वराहाचे स्मरण करावे आणि हा उत्सव उत्साहात साजरा करावा, असे आवाहन संतोष भाऊ ब्राम्हणे यांनी केले.

दरम्यान, वराह जयंतीच्या निमित्ताने धार्मिक कार्यक्रम, पूजा-अर्चा आणि विविध उपक्रमांचे आयोजन करून हा दिवस भक्तिभावाने साजरा करण्याचे आवाहन राष्ट्रीय श्रीराम संघाच्या वतीने करण्यात आले आहे. हिंदू बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्सवाची शोभा वाढवावी, असेही धर्मरक्षक संतोष भाऊ ब्राम्हणे यांनी म्हटले आहे. ''आपली संस्कृती आणि परंपरा हीच आपली ओळख आहे. धार्मिक उत्सवांच्या माध्यमातून समाज एकत्रित येतो. त्यामुळे वराह जयंती मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरी करूया,'' असे आवाहन संतोष भाऊ ब्राम्हणे यांनी केले आहे.

## निमगाव फाट्यावर गोरक्षनाथांचा भंडारा उत्सव उत्साहात

### अभिषेक, किर्तन व महाप्रसादाने उत्सव उत्साहात साजरा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नगर-कल्याण महामार्गावरील निमगाव वाघा फाटा येथील पुंड वस्तीवरील श्री गोरक्षनाथ मंदिरात सालाबादप्रमाणे श्री गोरक्षनाथ भंडारा उत्सव अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. अभिषेक, विधिवत पूजा, कीर्तन, धार्मिक कार्यक्रम आणि महाप्रसाद अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन बाळासाहेब पुंड व पुंड परिवाराच्या वतीने करण्यात आले होते अशी माहिती रामदास फुले यांनी दिली.

या उत्सवानिमित्त श्री गोरक्षनाथ मंदिर परिसराची विशेष स्वच्छता करण्यात आली होती. चौथ्या श्रावणी सोमवार निमित्त या उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते .मंदिर परिसर फुलांच्या आकर्षक सजावटीने, विविधरंगी रांगोळ्यांनी तसेच झगमगत्या विद्युत रोषणाईने सजविण्यात आला होता. सजावटीमुळे मंदिर परिसराचे धार्मिक आणि प्रसन्न वातावरण अधिकच खुलून दिसत होते. सकाळपासूनच भाविकांची दर्शनासाठी लगबग सुरू होती. 'श्री गोरक्षनाथ प्रसन्न' आणि 'ॐ नमो आदेश' या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

या उत्सवानिमित्त बाळासाहेब पुंड यांच्या हस्ते वैदिक मंत्रोच्चारात श्री गोरक्षनाथ महाराजांना अभिषेक घालून विधिवत पूजा -अर्चा करण्यात आली . सामुदायिक आरतीचा कार्यक्रम झाला. यावेळी उद्योजक दिलीप दाते ,माजी सरपंच अंबादास पुंड, माजी उपसरपंच फारुख सय्यद, सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले, बाळासाहेब पुंड, मच्छिंद्र पुंड , कचरू पुंड ,रवी पुंड ,किरण पुंड, ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ पुंड, प्राध्यापक भाऊसाहेब पुंड, योगेश वारुळे, समता परिषदेचे कार्यकर्ते, परिसरातील भाविक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सायंकाळी ५ ते ७ या वेळेत ह.भ.प. घनश्याम महाराज दळवी यांचे सुश्राव्य व प्रबोधनात्मक कीर्तन झाले. आपल्या ओघवत्या, रसाळ आणि प्रभावी वाणीने त्यांनी श्रावण महात्म्य, शिवपुराणातील विविध कथा तसेच श्री गोरक्षनाथ महाराजांच्या चरित्रावर निरूपण केले. भक्ती, अध्यात्म आणि सामाजिक प्रबोधन यांचा सुंदर मेळ साधत त्यांनी उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले.

श्रावण हा केवळ पूजा-अर्चेचा महिना नसून आपल्या जीवनात चांगले संस्कार रुजविण्याची संधी देणारा महिना आहे. देवाच्या मंदिरात येऊन माथा टेकविणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच देवाने दाखविलेल्या मार्गावर चालणे महत्त्वाचे आहे. श्री गोरक्षनाथ महाराजांनी संयम, साधना आणि सदाचाराचा मार्ग समाजाला दाखविला. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या जीवनात सत्य, सदाचार, परोपकार आणि सेवाभाव जोपासला पाहिजे. मंदिरातील भक्ती ही आपल्या आचरणात दिसली, तरच त्या भक्तीला खरा अर्थ प्राप्त होतो असे प्रतिपादन घनश्याम महाराज दळवी यांनी केले.

## शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर शिक्षक आमदार दराडेंचा 'शिक्षक दरबार'; अधिकाऱ्यांना दिरंगाई न करण्याची तंबी

### शालार्थ आयडीपासून निवडश्रेणी, पोस्ट क्रिएटपर्यंत प्रश्नांचा पाढा; शिक्षकांच्या अडचणींवर दराडेंनी विचारला प्रशासनाला जाब

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** जिल्ह्यातील मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विविध प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी नाशिक विभागाचे शिक्षक आमदार किशोर दराडे यांनी सोमवारी (दि. ७ सप्टेंबर) जिल्हा परिषदेत शिक्षक दरबार घेतला. जिल्हा परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात झालेल्या या बैठकीस शिक्षण उपसंचालक गणपत मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी माध्यमिक शिक्षण विभागातील विविध प्रश्नांबाबत शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपल्या अडचणी मांडत प्रशासनाच्या दिरंगाईबद्दल नाराजी व्यक्त केली.

शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक चर्चा करताना आमदार किशोर दराडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना प्रश्न तातडीने निकाली काढण्याच्या सूचना दिल्या. 'शिक्षकांचे प्रश्न मार्गी लागले पाहिजेत. त्यांना विनाकारण त्रास होता कामा नये,' अशी स्पष्ट भूमिका घेत त्यांनी प्रशासनाला दिरंगाई न करण्याची तंबी दिली. तर पंधरा दिवसात प्रश्न न सुटल्यास पुढील बैठक शिक्षण आयुक्त कार्यालयात घेण्याचा इशारा संबंधित अधिकाऱ्यांना दराडे यांनी दिला.

या शिक्षक दरबारात माध्यमिक शिक्षण विभागाशी संबंधित अनेक महत्त्वाचे प्रश्न चर्चेत आले. शिक्षक नेते वैभव सांगळे यांनी माध्यमिक विभागात मोठ्या प्रमाणात प्रलंबित असलेल्या फायली, पोस्ट क्रिएट, निवडश्रेणी मान्यता तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शालार्थ आयडीसंदर्भातील प्रश्न आमदार दराडे यांच्या निदर्शनास आणून दिले. या प्रश्नांबाबत आमदार दराडे यांनी शिक्षणाधिकारी यांच्याशी चर्चा करून संबंधित प्रकरणे तातडीने निकाली काढण्याबाबत सूचना केल्या.

या बैठकीस शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, वेतन अधीक्षक रामदास म्हस्के, लेखा अधिकारी सतीश लहाने यांच्यासह संबंधित अधिकारी तसेच संभाजी पाटील, सुनील पंडित, आप्पासाहेब शिंदे, बाबासाहेब बोडखे, महेंद्र हिंगे, भाऊसाहेब कचरे, दिलीप काटे, शिक्षक नेते वैभव सांगळे, अशोक आव्हाड, सुनील भोर, सचिन झगडे, अमोल ठाणगे, रवींद्र देवडे, राजेंद्र डमाळे, रवींद्र गावडे, तौसीफ शेख, सुधाकर सुंबे, संभाजी थोरात आदींसह जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शालार्थ आयडीमध्ये असलेल्या विविध त्रुटी आणि दुरुस्त्यांचा प्रश्नही बैठकीत ऐरणीवर आला. काही शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शालार्थ आयडीशी संबंधित त्रुटी अद्याप दूर न झाल्यामुळे त्यांच्या वेतनावर परिणाम होत असल्याचे उपस्थितांनी सांगितले. आप्पासाहेब शिंदे यांनी शालार्थ आयडीच्या राहिलेल्या त्रुटींमुळे काही शिक्षकांचे वेतन बंद झाल्याचा गंभीर प्रश्न उपस्थित केला. या प्रश्नाची दखल घेत आमदार दराडे यांनी शिक्षण संचालक पालकर यांच्याशी थेट संपर्क साधून शालार्थ आयडीसंदर्भातील प्रश्न तातडीने मार्गी लावण्याबाबत चर्चा केली. त्यामुळे संबंधित शिक्षकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. यावेळी उपस्थित शिक्षक नेते व शिक्षकांनी देखील विविध प्रश्न उपस्थित केले.

# एसा सभासदांच्या मुलांसाठी शाडू मातीच्या गणेशमूर्ती कार्यशाळा

**बांधकाम खर्च कमी करण्यासाठी फिलर स्लॅब तंत्रज्ञानावर तांत्रिक व्याख्यान**
**पर्यावरण संवर्धनासोबत स्मार्ट इंजिनिअरिंगचा संदेश; एसा भवनमध्ये विविध उपक्रम**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पर्यावरणाचा होत असलेला ह्रास तसेच पीओपीच्या गणेशमूर्ती विसर्जित केल्यानंतर होणारे जलप्रदूषण आणि त्यातून निर्माण होणाऱ्या विषारी रासायनिक पदार्थांचे प्रदूषण रोखण्यासाठी शाडू मातीच्या गणेशमूर्ती हा उत्तम पर्याय आहे. हा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यासोबतच सभासद आणि त्यांच्या पाल्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, यासाठी शाडू मातीच्या गणेशमूर्ती बनविण्याच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याचे एसा संस्थेचे अध्यक्ष इंजि. प्रदीप तांदळे यांनी सांगितले.

आर्किटेक्ट्स, इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन (एसा), अहिल्यानगर यांच्या वतीने सभासद व त्यांच्या मुलांसाठी शाडू मातीच्या गणेशमूर्ती बनविण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली. हा उपक्रम पोलाद स्टील, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला. या कार्यशाळेत संस्थेचे २५ सभासद व त्यांचे पाल्य सहभागी झाले.

या उपक्रमासाठी कलाशिक्षक व फ्रीलान्स आर्टिस्ट भाऊसाहेब थोरात यांनी पुढाकार घेत सहभागी सभासद व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संस्थेच्या स्वमालकीच्या एसा भवन या वास्तूचे बांधकाम पूर्णत्वाच्या अंतिम टप्प्यात असून, याच वास्तूमध्ये हा उपक्रम राबवून नवीन कार्यकारिणीच्या काळातील उपक्रमांचा श्रीगणेशा करण्यात आला.

आर्टिस्ट भाऊसाहेब थोरात यांनी सांगितले की, शहरात शाडू मातीपासून बनविलेल्या गणेशमूर्तींना मागणी वाढत आहे. आपल्या हाताने बनविलेल्या गणेशमूर्तीची गणेशोत्सवात स्थापना करणे आनंद व समाधान देणारे असते. या मूर्ती बनविण्यासाठी शाडू माती २४ तास आधी भिजवून ठेवावी लागते. मूर्ती तयार केल्यानंतर चार-पाच दिवसांनी ती सुकल्यानंतर त्यावर नैसर्गिक रंग दिले जातात. विसर्जनावेळी या मूर्ती पाण्यात सहज विरघळतात आणि त्यामध्ये कोणतेही विषारी केमिकल नसल्याने त्या पर्यावरणपूरक ठरतात.

या उपक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेच्या माजी अध्यक्षा मिनल काळे आणि इंजि. अजय किर्तानी यांनी भूषविले. संस्था सचिव भूषण पांडव यांनी हा उपक्रम संस्थेच्या वतीने सलग दुसऱ्या वर्षी राबविण्यात येत असून, त्याला सभासदांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे सांगितले.

या कार्यशाळेत दिव्या क्षीरसागर, रौनक डागा, शौनक पांडव, संस्कृती पांडव, अन्वी आंबेकर, आर्या तांदळे, श्रेयस खांडेकर, जयंत खांडेकर, वल्लभ जगताप, अनुष्का येनगंदूल, वृषिका फुलसौंदर, यशोर्धन लोखंडे, आदिश्री अनारसे, शार्विल जाधव, राजश्री दरे, श्रीनिवास म्हसे आणि प्रणाली तांदळे यांनी सहभाग नोंदविला.

यानंतर लगेचच एसा भवनमध्ये दुसरा तांत्रिक उपक्रम घेण्यात आला. अहिल्यानगरमधील प्रथितयश आरसीसी डिझायनर इंजि. देवेंद्र पोतदार यांचे ''फिलर स्लॅब तंत्रज्ञानाचा वापर करून बांधकाम खर्च कमी करण्यासाठी स्मार्ट इंजिनिअरिंगचा वापर'' या विषयावर तांत्रिक व्याख्यान आयोजित करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना इंजि. देवेंद्र पोतदार यांनी सांगितले की, फिलर स्लॅब तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास अनावश्यक स्लॅबच्या तळातील कॉंक्रिटचा खर्च वाचविता येतो. कामाच्या फिनिशिंगसाठी आतील बाजूस मडके, पोकळ साहित्य अथवा डिझाइनचा वापर केला जातो. फिलर स्लॅबमध्ये येणारी समीकरणे तसेच त्यासंदर्भातील विविध तांत्रिक माहितीचे त्यांनी विश्लेषण करून उपस्थितांना मार्गदर्शन केले.

# आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते स्वप्नील खामकर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**भारतीय संस्कृती, तत्त्वज्ञान आणि मानवतेचा व्यापक वेध घेणारे 'भारत : द इटर्नल' प्रकाशित**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतीय संस्कृती, विचारपरंपरा, तत्त्वज्ञान आणि मानवतेच्या सार्वत्रिक दृष्टिकोनाचा व्यापक वेध घेणारे युवा साहित्यिक तथा उद्योजक स्वप्नील खामकर यांच्या 'भारत : द इटर्नल' या सहाव्या पुस्तकाचे प्रकाशन रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती होती.




या पुस्तकाच्या माध्यमातून भारताकडे केवळ भौगोलिक राष्ट्र किंवा प्राचीन संस्कृती म्हणून न पाहता, हजारो वर्षांची वैचारिक, आध्यात्मिक आणि मानवी परंपरा असलेली चिरंतन सभ्यता म्हणून पाहण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. भारतीय विचारांमधील मानवतावाद, सार्वत्रिकता, अहिंसा, वेदान्ताचा व्यापक दृष्टिकोन, जागतिक शांतता आणि मानवएकतेची संकल्पना यांचा पुस्तकात अभ्यासपूर्ण वेध घेण्यात आला आहे. भारताच्या ज्ञानपरंपरेने जगाला दिलेल्या विचारांचा आधुनिक जगाशी असलेला संबंध, भारतीय तत्त्वज्ञानातील मानवकेंद्री दृष्टिकोन तसेच भविष्यातील जागतिक समाजासाठी भारतीय विचारांचे महत्त्व यावरही पुस्तकातून प्रकाश टाकण्यात आला आहे.

आनंदराज आंबेडकर म्हणाले की, अत्यंत कमी वयात एवढा प्रतिभावान युवा लेखक पाहावयास मिळाला, ज्याने भारतीय संस्कृती, विचारपरंपरा आणि तत्त्वज्ञान आपल्या लेखणीतून मांडले आहे. युवकांचे पुस्तक वाचन कमी झाल्याने समाजातील प्रश्न त्यांना अवगत होण्यास वेळ जातो. स्वप्नील खामकर यांनी फिलॉसॉफीवर उत्तमपणे लिखाण केले असून, त्यांचे हे लेखन आजच्या युवकांसह विचारवंतांनाही दिशादर्शक असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार काशिनाथ दाते आणि खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनीही 'भारत : द इटर्नल' या पुस्तकाचे कौतुक करून स्वप्नील खामकर यांना पुस्तकासाठी शुभेच्छा दिल्या.

संजय खामकर म्हणाले की, स्वप्नील खामकर केव्हा लिहितो आणि कोणत्या विषयावर लिहितो, हे कळत नाही. फक्त पुस्तक प्रकाशन जवळ आल्याने याची माहिती मिळते. त्याच्या पुस्तकातून विचार पेरले जाणार असून, युवकांनी वाचनाकडे वळावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. स्वप्नीलला पुस्तक लिहिण्याची आवड असून, संपूर्ण कुटुंब त्याच्या पाठीशी उभे आहे. मुलांचे गुण ओळखून त्यांना वाव द्या. मुलांवर आपली स्वप्ने लादू नका, असा महत्त्वपूर्ण संदेशही संजय खामकर यांनी यावेळी दिला.

ज्येष्ठ साहित्यिक संजय कळमकर यांनी आजची जेन झी पिढी वाचत नाही, अशी ओरड होत असली तरी काही जेन झी युवक उत्तमपणे साहित्याचे लिखाण करत आहेत. ते आव्हानात्मक पुस्तके लिहीत आहेत. त्यामुळे संपूर्ण जेन झीला एकाच मापाने मोजणे चुकीचे असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकाशन सोहळ्यास चर्मकार विकास संघाचे प्रदेशाध्यक्ष संजय खामकर, संदीपदादा घनदाट, युवा नेते अमन आंबेडकर, महिला बालकल्याणचे बालाजी सोनटक्के, नगरसेवक सुरेश बनसोडे, मधुकर घनदाट, मच्छिंद्र दळवी, प्रतिभा खामकर, आण्णासाहेब खैरे, गुणगौरव सोहळा समितीचे संतोष कानडे, सुरेश शेवाळे, अरुण गाडेकर, सुभाष सोनवणे, संजय कानडे, राजेंद्र धस, सुनील धस, रामदास सातपुते, पाराजी साळे, सुरेश शेवाळे, भारत चिंधे, मनिष कांबळे, आरती सोनग्रा, अरुणा गोयल, रुक्मिणी नन्नावरे आदी उपस्थित होते.

# ११ सप्टेंबरचा बँक संप; 'पाच दिवसांचा आठवडा'सह द्विपक्षीय कराराच्या अंमलबजावणीसाठी लढा

**२८ ते ३० सप्टेंबरला तीन दिवसांचा संप; मागण्या मान्य न झाल्यास ऑक्टोबरमध्ये बेमुदत संपाचा इशारा**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पाच दिवसांचा बँकिंग आठवडा लागू करावा, तसेच कामगिरीशी निगडित प्रोत्साहनपर भत्त्यातील भेदभाव दूर करून द्विपक्षीय करारातील तरतुदींची प्रामाणिक अंमलबजावणी करावी, या प्रमुख मागण्यांसाठी देशभरातील बँक कर्मचारी ११ सप्टेंबर रोजी संपावर जाणार आहेत. हा संप केवळ पाच दिवसांच्या आठवड्यासाठी नसून, द्विपक्षीय करार, सामूहिक सौदेबाजीचा अधिकार आणि बँक कर्मचाऱ्यांच्या संघटित चळवळीच्या अस्तित्वासाठीचा संघर्ष असल्याचे महाराष्ट्र स्टेट बँक एम्प्लॉईज फेडरेशनचे अध्यक्ष तथा ऑल इंडिया बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज फेडरेशनचे जनरल सेक्रेटरी धनंजय कुलकर्णी यांनी स्पष्ट केले.

अहिल्यानगर येथे याबाबत माहिती देताना बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज युनियन पुणे युनिटचे ऑर्गनायझेशन सेक्रेटरी कॉ. प्रकाश कोटा यांनी सांगितले की, पाच दिवसांचा बँकिंग आठवडा ही कर्मचाऱ्यांची अनेक वर्षांपासूनची मागणी आहे. २०१५ मधील दहाव्या द्विपक्षीय कराराच्या वेळी महिन्यातील चारही शनिवारी अर्धा दिवस काम करण्याऐवजी दुसरा व चौथा शनिवार पूर्ण सुट्टी आणि उर्वरित दोन शनिवारी पूर्ण दिवस कामकाजाची व्यवस्था स्वीकारण्यात आली. त्यानंतर अकराव्या आणि बाराव्या द्विपक्षीय कराराच्या प्रक्रियेत उर्वरित शनिवारही सुट्टी देण्याबाबत सहमती झाली आणि प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला.

त्यामुळे आता मान्य झालेली बाब अनिश्चित काळासाठी प्रलंबित ठेवणे म्हणजे द्विपक्षीय वाटाघाटींच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे. करार हे केवळ कागदावरील दस्तऐवज नसून परस्परविश्वासाचे प्रतीक आहेत. मान्य तरतुदींची अंमलबजावणीच होणार नसेल तर कर्मचारी संघटनांनी व्यवस्थापनाशी वाटाघाटी का कराव्यात, असा सवालही उपस्थित करण्यात आला.

पाच दिवसांचा आठवडा लागू झाल्यास कर्मचाऱ्यांचे कामाचे तास कमी होतील, असा केला जाणारा प्रचार दिशाभूल करणारा असल्याचे संघटनांचे म्हणणे आहे. प्रस्तावित व्यवस्थेत सोमवार ते शुक्रवार या पाच दिवसांत दररोज सुमारे ४० मिनिटे कामकाजाची वाढ होणार आहे. त्यामुळे एकूण कामाच्या वेळेत कपात होणार नसून कामकाजाची पुनर्रचना होणार आहे.

दिवसअखेरचा ताळमेळ, कर्जवसुली, सरकारी योजनांची अंमलबजावणी, लेखापरीक्षण, अनुपालन, डिजिटल व्यवहारांशी संबंधित तक्रारी आणि विविध प्रशासकीय कामांमुळे बँक कर्मचारी नियमित कार्यालयीन वेळेपेक्षा अधिक काळ काम करतात. त्यातच अनेक शाखांमध्ये मनुष्यबळाची कमतरता असल्याने कर्मचाऱ्यांवरील ताण वाढत आहे.

आरबीआय, विमा क्षेत्रासह वित्तीय क्षेत्रातील अनेक संस्थांमध्ये पाच दिवसांचा आठवडा लागू आहे. यूपीआय, एटीएम, इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, कॅश डिपॉझिट मशीन आणि बिझनेस करस्पॉन्डंट यांसारख्या सुविधांमुळे अनेक बँकिंग सेवा सातही दिवस उपलब्ध आहेत. त्यामुळे ग्राहकसेवेचे कारण देऊन पाच दिवसांच्या आठवड्याला विरोध करणे विसंगत असल्याचा दावा संघटनांनी केला आहे.

ग्राहकसेवा सुधारण्यासाठी पुरेसे प्रशिक्षित मनुष्यबळ, सक्षम डिजिटल व्यवस्था, प्रभावी तक्रार निवारण आणि रिक्त पदांची भरती आवश्यक आहे. शाखांमधील कर्मचारी कमतरता दूर करण्याऐवजी कंत्राटी व आउटसोर्सिंगवर भर देणे योग्य नसल्याची भूमिकाही संघटनांनी मांडली.

द्विपक्षीय करारानुसार कर्मचारी व अधिकाऱ्यांसाठी निश्चित केलेल्या योजनेच्या अंमलबजावणीत भेदभाव केला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. उच्चपदस्थ व्यवस्थापनासाठी स्वतंत्र आणि अधिक लाभदायक योजना लागू करण्याऐवजी बँकेच्या यशात योगदान देणाऱ्या सर्व स्तरांतील कर्मचाऱ्यांना न्याय्य पद्धतीने प्रोत्साहन मिळावे, अशी मागणी आहे. बँकेची कामगिरी ही केवळ वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या प्रयत्नांमुळे होत नाही. सफाई कर्मचारी, अधीनस्थ कर्मचारी, ग्राहकसेवा कर्मचारी, अधिकारी, तांत्रिक कर्मचारी, कर्जवसुली कर्मचारी आणि प्रशासकीय कर्मचारी यांच्या सामूहिक योगदानातून बँकेची प्रगती होते. त्यामुळे प्रोत्साहनाचे लाभही न्याय्य पद्धतीने वितरित झाले पाहिजेत, असे संघटनांचे म्हणणे आहे.

उच्चपदस्थांच्या आर्थिक लाभांना केवळ अल्पकालीन नफा, व्यवसायवाढ किंवा कर्जवाटपाच्या लक्ष्यांशी जोडल्यास अधिक जोखीम घेण्याची प्रवृत्ती वाढू शकते. त्याचा परिणाम भविष्यात बँकांच्या कर्जगुणवत्तेवर होऊन अनुत्पादक मालमत्ता वाढण्याची शक्यता असते.

# ध्वनी, वायू प्रदूषण बंदी नव्हे, नियमन हवे - जाणीव फाऊंडेशन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** जाणीव फाऊंडेशनच्या वतीने वतीने मोहटादेवी ट्रस्टचे विश्वस्त नोटरी पब्लिक ॲड. विक्रम वाडेकर, बांधकाम व्यावसायिक प्रदीप वाखुरे, प्रा हर्षल आगळे, उद्योजक विकास गायकवाड, छायाचित्रकार राहुल जोशी, ॲड. व इंजिनीअर कैलाश दिघे इत्यादींच्या हस्ते अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे साहेब यांना देण्यात आले.
सध्या शहरासह जिल्ह्यात वाढत्या ध्वनी व वायू प्रदूषणामुळे सर्वसामान्य जनतेचे आरोग्य गंभीरपणे बाधित होत आहे. विशेषत: विविध कार्यक्रमांमध्ये अनधिकृत पद्धतीने वापरले जाणारे फटाके, बुलेटच्या सायलेन्सर मधून फटाक्यासारखा येणारा आवाज, प्लाझ्मा, लेझर लाईट्स, सेट्स, तसेच काही चौकांमध्ये / मंगल कार्यालयांमध्ये रात्री उशिरापर्यंत चालणारे कार्यक्रम यामुळे निर्माण होणारा मोठ्या प्रमाणातील आवाज व धूर जनजीवनावर विपरीत परिणाम करीत आहे.

या प्रदूषणाचा आजारी रुग्ण, वयोवृद्ध नागरिक, लहान मुले, तसेच परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी यांना अक्षरशः असह्य त्रास होत आहे. रात्रीच्या वेळी परवानगीशिवाय किंवा निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक आवाजात वाजवले जाणारे , फटाक्यांचे दणदणाट, तसेच इतर कार्यक्रमांतील वायु, ध्वनीप्रदूषण यामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत.

''आपल्याला आनंद मिळतोय पण त्याचा इतरांना विनाकारण त्रास होत असेल, तर त्याला आनंद तरी कसा म्हणायचा?'' हा तर असुरी आनंद आहे. दुर्दैवाने पैशाच्या उन्मादात नागरिकांना समाजभान राहिलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. कायद्याच्या धाकाने का असेना त्यांना जाणीव करून द्यावी लागणार आहे. म्हणूनच प्रशासनाच्या वतीने तातडीची कडक कार्यवाई करावी, ज्यामुळे आपल्या शहरासह जिल्ह्यातील पर्यावरण संरक्षणास हातभार लागेल आणि नागरिकांचे आरोग्य सुरक्षित राहील अशी विनंती या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

(पान १ वरून)

## नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी - खा. निलेश लंके

केवळ खरीप पिकांपुरता मर्यादित नसून आगामी रब्बी हंगामावरही होण्याची शक्यता आहे. अनेक शेतकऱ्यांनी खरीपातून मिळणाऱ्या उत्पन्नावर रब्बीची पेरणी, बियाणे, खते आणि मशागतीचा खर्च भागविण्याचे नियोजन केले होते. मात्र खरीप हंगामच संकटात आल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक अडचणी उभ्या राहिल्या आहेत. अनेक भागांत विहिरींच्या पाणीपातळीतही घट झाली असून पावसाचा खंड आणखी वाढल्यास पिण्याचे पाणी तसेच पशुधनासाठी पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे.

जिल्ह्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत दूध व्यवसायाचे महत्त्व मोठे आहे. जिल्ह्यात सुमारे १६ लाख मोठे पशुधन असून त्यातून दररोज सुमारे ४२ लाख लिटर दूध उत्पादन होत असल्याची माहिती आहे. मात्र पावसाअभावी चारा पिकांवरही परिणाम झाल्याने पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता चिंतेचा विषय बनली आहे. चारा टंचाई निर्माण झाल्यास त्याचा थेट परिणाम दूध उत्पादनावर आणि दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होणार आहे. त्यामुळे परिस्थिती अधिक गंभीर होण्यापूर्वी प्रशासनाने आवश्यक त्या ठिकाणी चारा छावण्या सुरू करून पशुधनासाठी चारा व पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी खासदार लंके यांनी केली आहे. पावसाच्या खंडामुळे काही भागांत शेतकऱ्यांना उभे पीक मोडून टाकण्याची वेळ आली आहे. एका एकरातील सोयाबीन पिकासाठी बियाणे, खते, औषधे, मशागत आणि मजुरी असा मोठा खर्च झाल्यानंतरही उत्पादनाची शक्यता मावळली आहे. त्यामुळे पंचनामे करताना प्रत्यक्ष शेतावर जाऊन वस्तुनिष्ठ पाहणी करावी आणि पात्र शेतकऱ्यांना शासनाच्या निकषांनुसार पुरेशी नुकसानभरपाई मिळेल, याची दक्षता घ्यावी, अशी मागणी खासदार लंके यांनी केली आहे. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये पावसाची सद्यस्थिती, पीक परिस्थिती, पिकांचे नुकसान, उपलब्ध जलसाठे, भूजल पातळी आणि शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती यांचा तालुकानिहाय आढावा घेऊन दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर करण्याबाबत शासनाकडे तातडीने प्रस्ताव पाठवावा, असेही त्यांनी निवेदनात म्हटले आहे. यंदाच्या पावसाच्या अनियमिततेमुळे परिस्थिती अधिक गंभीर झाली असून जून-जुलैमध्ये काही प्रमाणात पाऊस झाल्यानंतर ऑगस्ट आणि सप्टेंबरच्या सुरुवातीला पावसाने मोठी ओढ दिली. त्यामुळे जमिनीतील ओलावा कमी होऊन अनेक ठिकाणी पिकांची वाढ खुंटली आहे. विशेषतः सोयाबीन, तूर, मका आणि चारा पिकांना याचा मोठा फटका बसला आहे. प्रशासनाने केवळ नुकसान झाल्यानंतर मदत देण्याची भूमिका न घेता संभाव्य पाणी व चारा टंचाईचा पूर्वतयारीने सामना करावा, अशी अपेक्षाही खासदार लंके यांनी व्यक्त केली. ''आज शेतकरी मोठ्या आर्थिक संकटातून जात आहे. शेतीसाठी झालेला वाढता खर्च आणि पावसाच्या खंडामुळे घटलेली उत्पादनाची शक्यता यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे बिघडले आहे. त्यामुळे ही परिस्थिती केवळ पावसातील कमतरता म्हणून न पाहता शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील गंभीर संकट म्हणून पाहण्याची गरज आहे,'' असे खा. निलेश लंके यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. नुकसानग्रस्त भागांची विशेष नोंद घेऊन शासकीय मदतीपासून एकही पात्र शेतकरी वंचित राहू नये, तसेच पिण्याचे पाणी, चारा, पीक नुकसानभरपाई, वीजबिलातील सवलती आणि इतर आवश्यक मदत उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांशी समन्वय साधावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. प्रशासनाने या सर्व बाबींवर तातडीने कार्यवाही करून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल आपल्या कार्यालयास कळवावा, अशी मागणीही खासदार लंके यांनी केली आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष शरद पवार, गणेश तोडमल, प्रकाश पोटे, निलेश मालपाणी, पाथर्डी येथील रोहिणी राजळे, नगरसेवक योगीराज गाडे, बाबाजी तरटे, माजी सभापती बाळासाहेब हराळ, महादेवराव कोकाटे, शशी गव्हाणे, शिवाजी होळकर, हरिदास शिर्के, अथर खान, अभिजीत ससाणे तसेच शेतकरी, पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## पारनेर येथे बेकायदा मावा बनवणाऱ्या अड्ड्यावर छापा

रा. भाळवणी, ता. पारनेर) याला ताब्यात घेतले. घटनास्थळावरून मावा तयार करण्यासाठी वापरण्यात येणारी १ लाख रुपये किमतीची इलेक्ट्रिक मशिन, चार हजार रुपये किमतीचा २ किलो तयार मावा, एक हजार रुपये किमतीचा १ किलो सुपारीचा चुरा असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी आरोपीविरुद्ध पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अंमलदार संदीप पवार, विजय ठोंबरे, अतुल लोटके, शाहीद शेख आणि अभिजीत अरकल यांच्या पथकाने केली.

## प्यारे खान यांनी प्रशासनाचे वकीलपत्र घेण्याची आवश्यकता नव्हती!

१२ ऑगस्ट २०२६ रोजी अभिलेखांसह तक्रार करण्यात आली आहे. या तक्रारीची दखल घेऊन अल्पसंख्याक आयोगाच्या सचिवांनी जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांना प्रकरणाची चौकशी करून आवश्यक कार्यवाहीचा अहवाल आयोगाला सादर करण्याबाबत कळविले आहे. संबंधित अधिकाऱ्यांचा अहवाल अद्याप आयोगाला प्राप्त झालेला नसताना आयोगाच्या अध्यक्षांनी प्रशासनाने दिलेल्या माहितीच्या आधारे निष्कर्षासारखे वक्तव्य करणे घाईचे, एकतर्फी आणि अन्यायकारक आहे.

आयोगाच्या सचिवांनी एकीकडे अधिकृत चौकशी अहवाल मागवायचा आणि तो अहवाल प्राप्त होण्यापूर्वीच अध्यक्षांनी ''असा कोणताही प्रकार घडलेला नाही'' असा निर्वाळा द्यायचा, ही आयोगाची परस्परविरोधी भूमिका नाही का, असा प्रश्नही शेख यांनी उपस्थित केला आहे.
अधिकृत अभिलेखांची पडताळणी का झाली नाही?

तक्रारीमध्ये युनियनच्या पदाधिकाऱ्यांची भाषणे, यूट्यूबवरील व्हिडिओ, प्रसिद्ध वृत्तपत्रीय बातम्या, परिसरातील सीसीटीव्ही चित्रण, घंटागाड्यांच्या नोंदी, पाणीपुरवठ्याच्या नोंदी, कर्मचारी हजेरीपत्रक, युनियनच्या बैठकीचे इतिवृत्त, मागणीपत्रे आणि महानगरपालिकेचा अधिकृत पत्रव्यवहार तपासण्याची मागणी करण्यात आली आहे.

या अभिलेखांची पडताळणी केल्यास संबंधित कालावधीत मुकुंदनगर, फकीरवाडा आणि दर्गादायरा भागांत कोणत्या नागरी सेवा पुरविण्यात आल्या, कोणत्या सेवा रोखण्यात आल्या आणि त्यासाठी कोण जबाबदार होते, हे स्पष्ट होऊ शकते. मात्र पुरावे न तपासता नागरिकांची तक्रार म्हणजे प्रशासनाला बदनाम करण्याचा प्रयत्न असल्याचे चित्र निर्माण करणे तक्रारदारांसह मुकुंदनगरमधील नागरिकांवर अन्याय करणारे आहे.
आयोगाला दंडात्मक कारवाईचा नव्हे, शिफारस करण्याचा अधिकार
महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग हा न्यायालय, न्यायाधिकरण किंवा फौजदारी तपासयंत्रणा नाही. आयोगाला तक्रारीची चौकशी करणे, संबंधित प्रशासनाकडून खुलासा, अभिलेख आणि अहवाल मागविणे, अल्पसंख्याकांच्या हक्कांवरील परिणाम तपासणे तसेच वस्तुस्थितीच्या आधारे राज्य शासनाला योग्य कार्यवाहीची शिफारस करणे एवढेच वैधानिक अधिकार आहेत.

आयोगाला स्वतः दंडात्मक किंवा फौजदारी कारवाई करणे अथवा न्यायालयाप्रमाणे अंतिम व बंधनकारक आदेश देण्याचा अधिकार नाही. त्यामुळे ''कोणाची तक्रार असल्यास मी कारवाई करीन'' असे विधान करण्यापूर्वी आयोगाच्या अध्यक्षांनी आपल्या वैधानिक अधिकारांच्या मर्यादांचे भान ठेवणे आवश्यक होते. माननीय मुंबई उच्च न्यायालयाने , . , दिनांक ८ ऑगस्ट २०२४ या निर्णयातही अल्पसंख्याक आयोगाच्या अधिकारांचे स्वरूप आणि मर्यादा स्पष्ट केल्या आहेत. आयोगाचे काम तक्रारीची निष्पक्ष चौकशी करून शासनाला शिफारस करणे आहे; प्रशासनाच्या बाजूने अंतिम निर्वाळा देणे किंवा चौकशीपूर्वीच नागरिकांची तक्रार असत्य ठरविणे नाही.
न्यायासाठी उच्च न्यायालयात दाद मागणार

प्यारे खान यांनी मुकुंदनगर, फकीरवाडा आणि दर्गादायरा भागांना प्रत्यक्ष भेट देऊन नागरिकांचे म्हणणे ऐकावे. युनियन पदाधिकाऱ्यांची भाषणे, यूट्यूबवरील व्हिडिओ, प्रसिद्ध वृत्तपत्रीय बातम्या आणि महानगरपालिकेचे अधिकृत अभिलेख तपासावेत. तसेच जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षकांचा चौकशी अहवाल प्राप्त होण्यापूर्वी ''नागरी सुविधा बंद नव्हत्या'' आणि ''प्रशासनाला बदनाम करण्याचा प्रयत्न होत आहे'' असे विधान कोणत्या अधिकृत पुराव्यांच्या आधारावर केले, याचा सार्वजनिक खुलासा करावा. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होऊन मुकुंदनगरमधील नागरिकांना न्याय मिळावा, यासाठी लवकरच माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाद मागण्यात येणार आहे. युनियन पदाधिकाऱ्यांची भाषणे, यूट्यूबवरील व्हिडिओ, प्रसिद्ध वृत्तपत्रीय बातम्या, विविध आयोग व विभागांकडे केलेल्या तक्रारी, अल्पसंख्याक आयोगाच्या सचिवांनी जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षकांकडून मागविलेला चौकशी व कार्यवाही अहवाल तसेच महानगरपालिकेचे संबंधित अभिलेख न्यायालयासमोर सादर करण्यात येतील, असे शेख यांनी स्पष्ट केले.